# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक: 020-25621205

Telephone No.: 020-25621205

Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग

P.G. Admission Section

Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय:– SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना '' व ''डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना'' करीता उत्पन्न प्रमाणपत्राऐवजी ''नॉन क्रीमी लेयर प्रमाणपत्र '' अपलोड करणे बंधनकारक असण्याबाबत.**

संदर्भ : शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. ससं/उशि/पुवि/SEBC/2024-25, दि. ३०/०६/२०२५.

या परिपत्रकाद्वारे मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग/संकुल यांना कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. ससं/उशि/पुवि/SEBC/2024-25, दि. ३०/०६/२०२५. रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य शासन पुरस्कृत SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना'' व ''डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना'' **या दोन्ही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येते**.

शैक्षणिक वर्ष २०२४ –२५ पासून, राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, शासन मान्यता प्राप्त खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये तसेच शासकीय विद्यापीठांमध्ये विना अनुदानित तत्वावर सुरू असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या राज्यातील सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरिता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून, त्या ऐवजी ''नॉन क्रीमी लेयर प्रामणपत्र'' सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

महाडीबीटी पोर्टल वर SEBC प्रवर्गातील अर्जदाराने सादर करताना, सामान्य प्रशासन विभागाच्या निर्णय क्रमांक संकीर्ण–२०२४ प्र. क्र. ७५ (भाग –१)/आरक्षण–५ दि. २१.०१.२०२५ नुसार उत्पन्न प्रमाणपत्राऐवजी ''नॉन क्रीमी लेयर प्रामणपत्र'' अपलोड करणे बंधनकारक आहे. यासंदर्भात महा आय टी मुंबई कार्यालयामार्फत महाडीबीटी पोर्टलवर आवश्यक बदल करण्यात आले आहेत.

तरी सर्व महाविद्यालय/संस्था यांनी वरील सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/ ९६८७ }
दिनांक : ०४/०७/२०२५ }

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव,

सोबत:– शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांच्या दिंनाक ३०/०६/२०२५ पत्राची प्रत.

**प्रत:**

१. मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/संकुल, प्रस्तुत विद्यापीठ.
यांना विनंती की या परिपत्रकाचा आशय सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून द्यावा.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**17, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे 411 001**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – jdhepune.in

फोन नं 020-26127833 / 26051632 फॅक्स नं. 020-26051632

जा.क्र. – ससं/उशि/पुवि / SEBC/2024-25/ दिनांक : 30.06.2025

**परिपत्रक**

प्रति,

1. प्राचार्य,
   सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
   कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
   पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
   तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
2. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
3. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
4. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
5. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
6. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
7. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
8. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी “ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना ” व “ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना ” करीता उत्पन्न प्रमाणपत्राऐवजी “ नॉन क्रीमी लेयर प्रमाणपत्र ” अपलोड करणे बंधनकारक असण्याबाबत.**

संदर्भ : - 1. शासन पत्र क्र. बैठक – 2025 / प्र. क्र. 28 / तां शि – 4,दि . 14.02.2025.
2. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण – 2024/ प्र. क्र. 75 ( भाग- 1 ) आरक्षण – 5, दि . 21.01.2025.

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राज्य शासन पुरस्कृत SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी “ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना ” व “ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना ” या दोन्ही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येते.

शैक्षणिक वर्ष 2024-25 पासून, राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, शासन मान्यता प्राप्त खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये तसेच शासकीय विद्यापीठांमध्ये विना अनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी

प्रवेश घेतलेल्या राज्यातील सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजने करिता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून, त्या ऐवजी " नॉन क्रीमी लेयर प्रमाणपत्र " सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

महाडीबीटी पोर्टल वर SEBC प्रवर्गातील अर्जदाराने सादर करताना, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2024 प्र. क्र. 75 (भाग – 1) / आरक्षण – 5 दि. 21.01.2025 नुसार उत्पन्न प्रमाणपत्राऐवजी " नॉन क्रीमी लेयर प्रमाणपत्र " अपलोड करणे बंधनकारक आहे. यासंदर्भात महा आय टी मुंबई कार्यालयामार्फत महाडीबीटी पोर्टलवर आवश्यक बदल करण्यात आले आहेत.

तरी सर्व महाविद्यालय, संस्था व विद्यापीठे यांनी वरील सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

Signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 30-06-2025 14:33:25

**(डॉ. अशोक उबाळे )**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे 16 यांना माहितीस्तव सविनय सादर.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,**
**४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६**
**Web-ww.dhepune.gov.in** फोन नं.०२०/ २९७०७०९८ E-Mail : schol.dhepune@gov.in

क्र.उशिसं-/शिष्य/२०२४-२५/ SEBC/E- १४३६६८२ दिनांक - /0६/२०२५

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय : SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" करीता उत्पन्न प्रमाणपत्राऐवजी "नॉन क्रीमी लेयर प्रमाणपत्र" अपलोड करणे बंधनकारक असण्याबाबत.**

संदर्भ :१. शासन पत्र क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.२८/तांशि-४, दिनांक १४-०२-२०२५.
२.शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.७५(भाग-१) आरक्षण-५, दिनांक २९-०१-२०२५
३. शासन पत्र दिनांक २१-०१-२०२५..

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राज्य शासन पुरस्कृत **SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** व **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना"** या दोन्ही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येते.

शैक्षणिक वर्ष 2024-25 पासून, राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने तसेच शासकीय विद्यापीठांमध्ये विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरिता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून, त्याऐवजी "नॉन क्रीमी लेयर" प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

महा-DBT पोर्टलवर SEBC प्रवर्गातील अर्जदाराने अर्ज सादर करताना, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.७५ (भाग-१)/आरक्षण-५, दिनांक २९/०१/२०२५ व शासन पत्र दिनांक

२१/०१/२०२५ नुसार उत्पन्न प्रमाणपत्राऐवजी "नॉन क्रीमी लेयर प्रमाणपत्र" अपलोड करणे बंधनकारक आहे. या संदर्भात महा-IT मुंबई कार्यालयामार्फत महा-DBT पोर्टलवर आवश्यक बदल करण्यात आले आहेत.

तरी, आपल्या अधिनस्त महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांना आपल्या स्तरावरून सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी वरील सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 25-06-2025 18:40:36

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १६.

प्रत - मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

"जनहिताय सर्वदा"

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२०४०९३५
Email ID: tashi4-hted@mah.gov.in

क्रमांक : बैठक-२०२५/प्र.क्र. २७/तांशि-४
दिनांक : १४ फेब्रुवारी, २०२५

तात्काळ

प्रति,

१) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई
४) सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई
५) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय :- मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व वसतिगृह निर्वाह भत्ता योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भाततील बैठकीबाबत..**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५.०२.२०२५ रोजी त्यांच्या मंत्रालयीन दालनात बैठक संपन्न झाली आहे. सदरहू बैठकीचे इतिवृत्त पुढील आवश्यक तात्काळ कार्यवाहीस्तव सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

सं.पु.खोरगडे

(संतोष पु. खोरगडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र : वरीलप्रमाणे

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित :-
१) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई.

३) मुख्य परिचलन अधिकारी, महाआयटी, एपीजेय हाऊस, मुंबई.

४) संबंधित विभागाच्या अधिपत्याखालील सर्व संबंधित संचालनालये / आयुक्तालये (संबंधित विभागांमार्फत).

५) सह सचिव (तंशि)/ उप सचिव (मशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत :-

१) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्य मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय्य सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय्य सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (इतर मागास व बहुजन कल्याण) यांचे स्वीय्य सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव (साविस/सामान्य प्रशासन विभाग) यांचे स्वीय्य सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७) सह सचिव, मा. मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
८) सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती (तांशि-४).

# बैठकीचे इतिवृत्त

विषय :- मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व वसतिगृह निर्वाह भत्ता योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात झालेल्या बैठकीबाबत..

मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेच्या अंमलबजावणीबाबत दि.०५.०२.२०२५ रोजी दु.०३.३० वा. बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मंत्री महोदयांनी अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांना उपरोक्त संदर्भात मा.मुख्य सचिव यांच्यासमवेत बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिले होते.

त्या अनुषंगाने उपरोक्त विषयाबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५.०२.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा. त्यांच्या मंत्रालयीन दालनात बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस संबंधित प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्यानुषंगाने मा.मुख्य सचिव यांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे आहेत :-

| अ. क्र. | उपस्थित करण्यात आलेला मुद्दा | मा. मुख्य सचिव यांचे निर्देश | कार्यवाही करणारा विभाग / कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सन २०२४-२५ करिता राबविण्याबाबत व यासंदर्भात सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पाकरिता आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत... | १) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना राबविणाऱ्या संबंधित प्रशासकीय विभागांनी (उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग, इ.) सदर योजना सन २०२४-२५ करिता SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्याची कार्यवाही करावी.<br>२) या योजनेंतर्गत SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या सन २०२४-२५ च्या शिष्यवृत्तीकरिता सद्यस्थितीतील लेखाशिषांतर्गत आवश्यक अतिरिक्त निधीची मागणी संबंधित प्रशासकीय विभागांनी (उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग, इ.) पुरवणी मागणीद्वारे करावी.<br>३) SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्याकरिता सदर योजना सन २०२५-२६ करिता राबविण्यासाठी आवश्यक कार्यवाही जसे की - स्वतंत्र लेखाशिर्ष, निधीची तरतूद इ. बाबतची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागांनी (उच्च व तंत्र | उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग इ. तसेच, वित्त विभाग. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग, इ.) करावी. | |
| २ | SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना सन २०२४-२५ करिता राबविण्याबाबत व यासंदर्भात सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पाकरिता आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत... | १) डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना राबविणाऱ्या संबंधित प्रशासकीय विभागांनी (उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग, इ.) सदर योजना सन २०२४-२५ करिता SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्याची कार्यवाही करावी.<br>२) या योजनेंतर्गत SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या सन २०२४-२५ च्या निर्वाह भत्त्या करिता सद्यस्थितीतील लेखाशिर्षांतर्गत आवश्यक अतिरिक्त निधीची मागणी संबंधित प्रशासकीय विभागांनी (उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग, इ.) पुरवणी मागणीद्वारे करावी.<br>३) SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता सदर योजना सन २०२५-२६ करिता राबविण्यासाठी आवश्यक कार्यवाही जसे की - स्वतंत्र लेखाशिर्ष, निधीची तरतूद इ. बाबतची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागांनी (उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग, इ.) करावी.<br>४) ही योजना राबविणाऱ्या संबंधित विभागांनी या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या निर्वाह भत्त्याचे दर हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्याप्रमाणे नसतील तर, सदर शासन निर्णयात नमूद अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील नियुक्त केलेल्या समितीच्या मान्यतेने सदर दर एकसमान करण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग इ. तसेच, वित्त विभाग. |
| ३ | SEBC प्रवर्गातील | १) वरीलप्रमाणे दोन्ही योजना SEBC | संबंधित विभागाच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन्ही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत. | प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असल्याबाबत व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी.<br>२) SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदर योजनांतर्गत अनुज्ञेय असलेल्या शिष्यवृत्तीकरिता अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींच्या निराकरणासाठी संबंधित संचालनालय / आयुक्तालय यांच्यामार्फत संबंधित संस्थास्तरावर विशेष मोहिम राबविण्यात यावी.<br>३) संस्थास्तरावर राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमेचा आढावा संबंधित संचालनालय / आयुक्तालय यांनी वेळोवेळी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात यावा.<br>४) SEBC प्रवर्गातील एकही पात्र विद्यार्थी सदर दोन्ही योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.<br>५) सदर योजनेंच्या प्रगतीचा आढावा संबंधित संचालनालय / आयुक्तालय यांनी प्रत्येक महिन्यातून किमान एकवेळा घ्यावा. | अधिपत्याखालील सर्व संबंधित संचालनालये / आयुक्तालये |
| ४ | SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेताना येणाऱ्या अडचणींबाबत. | सर्व संबंधित जात पडताळणी समित्यांना, SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक निर्देश देण्यात यावेत. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

****************

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**४ था माळा, मादाम कामा मार्ग,**
**हुतात्मा राजगुरु चौक ,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२**
**दुरध्वनी क्र. ०२२-२२७९४०१३** Email- prashant.waman@nic.in

क्र. : संकिर्ण -२०२४/प्र.क्र.७५ (भाग-१) /आरक्षण-५, दिनांकः- २१ जानेवारी, २०२५.

प्रति,

उप सचिव,
महिती व तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग)
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. १५.१०.२०२४ च्या अनुषंगाने महाडीबीटी पोर्टलवर आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत...

संदर्भ - सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-२०२४/प्र.क्र. ७५ (भाग-१)/आरक्षण-५ दि. १५.१०.२०२४

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील (एसईबीसी) विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करण्याबाबत दि. १५.१०.२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. तथापि, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने दि. १५.१०.२०२४ नंतर निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय शासन संकेतस्थळावरून काढून टाकण्यात आले होते.

२. सदर शासन निर्णयाच्या मसूद्यास मा. मुख्यमंत्री महोदयांची दि. १५.१०.२०२४ पूर्वीच म्हणजेच आदर्श आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच मान्यता मिळालेली होती. त्यानुसार दि. १५.१०.२०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या सदर शासन निर्णयानुसार शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता असणारे लाभ अनुज्ञेय करण्यात आलेले आहेत. तथापि, सदर शासन निर्णय संकेतस्थळावर उपलब्ध नसल्यामुळे काही शैक्षणिक संस्थांकडून उमेदवारांना सदर योजनेचा लाभ देण्यात अडचणी येत असून यामध्ये विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.

३. या विभागाने दि. १५.१०.२०२४ रोजी निर्गमित केलेला उपरोक्त शासन निर्णय सद्यस्थितीत लागू असून (सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.) त्याअनुषंगाने सदर शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असलेले शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेचे लाभ प्राप्त होण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर याअनुषंगाने आवश्यक ते बदल करणे गरजेचे आहे. सबब, याबाबत आपल्या स्तरावरून उचित कार्यवाही करण्यास्तव संबंधितांना निर्देश द्यावेत ही विनंती.

आपला,

29/9/2025

(प्रशांत वामन)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. संचालक,माहिती व तंत्रज्ञान महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

२. निवड नस्ती

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील (एसईबीसी) विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ७५ (भाग-१)/आरक्षण-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक - १५ ऑक्टोबर , २०२४

संदर्भ-

१. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरीता आरक्षण अधिनियम, २०२४, दि.२६.०२.२०२४
२. समक्रमांकाचे शासन परिपत्रक दि.११.०३.२०२४, ०५.०७.२०२४
३. समक्रमांकाचे शासन शुद्धीपत्रक दि.१५.०३.२०२४, २८.०६.२०२४
४. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.सारथी २०२०/प्र.क्र.३५ (भाग-२)/महामंडळे, दि.१४.०९.२०२०
५. शासन शुद्धीपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दिनांक २०.०९.२०२४

प्रस्तावना -

राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण (एसईबीसी) अधिनियम, २०२४ संदर्भ क्र. १ येथील अधिनियमान्वये राज्यात अंमलात आला असून याअन्वये राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील व पदांवरील सरळसेवांमधील नियुक्तीसाठी व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी १० टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले आहे. संदर्भ क्र.२ व ३ अन्वये महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरीता आरक्षण अधिनियम, २०२४ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने द्यावयाचे जात प्रमाणपत्र आणि नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये इतर मागास बहुजन कल्याण विभागाने राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द केली असून

त्याऐवजी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक केले आहे. या तरतूदीच्या धर्तीवर राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीही सदर तरतूद लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय-**

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात येत असून नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४१०१६१५१२०११५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRASHANT SURESH WAMAN

Digitally signed by PRASHANT SURESH WAMAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=f548550a634d80db515aa095c3a0b1681856 4d694beaef333445172eb1cc1b35, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F5D1BED3B1AFB58C99263DB8032426C4AC1287FF92A23D5D44AE3B7A535C602F, cn=PRASHANT SURESH WAMAN
Date: 2024.10.16 15:13:25 +05'30'

(प्रशांत वामन)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव,मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
६) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य/संसद सदस्य
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०)अपर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) सचिव, वैद्यकीय शिक्षण वऔषधी द्रव्ये विभाग, जी.टी. हॉस्पिटल, मुंबई.
१६) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-
१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८) मुख्य महानगर दंडाधिकारी,
१९) सर्व विभागीय आयुक्त.
२०) सर्व जिल्हाधिकारी,
२१) सर्व उप विभागीय दंडाधिकारी (महसूल) तथा उप विभागीय अधिकारी,
२२) सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
२३) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२४) महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२५) संचालक, विजाभज संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२६) संचालक, उच्च तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२७) संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२८) संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२९) सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,
३०) सर्व मंत्रालयीन विभाग त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात,
३१) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण
३२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३३) सर्व जिल्हा परिषदाचे समाजकल्याण अधिकारी
३४) सर्व अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
३५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३६) निवड नस्ती, आरक्षण-५